# मुख्य वनसंरक्षक(प्रादेशिक), कोल्हापूर यांचे कार्यालय

" वनवर्धन ", प्रधान डाकघरासमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३.
☎कार्यालय-०२३१/२६५३६३२, निवास-२६५३६३४, फॅक्स-२६५९२३३ E-mail-ccftkolhapur@gmail.com

**पत्र :** क्र.: कक्ष-४-४/आस्था/जे.सु.१५/४०३५
कोल्हापूर - ३.दिनांक :- २०/११/२०१५

प्रति,
उपवनसंरक्षक, कोल्हापूर / सातारा.

विषय - वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाकडील " ट्रॅक्टर चालक " या संवर्गाची दि. १/१/२०१५ रोजीची अंतिम जेष्ठतायादी प्रसिध्द करणेबाबत...
संदर्भ : १.या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-४-४/आस्था/जे.सु.१५/२०६९, दि. १/८/२०१५.
२.या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-४-४/आस्था/जे.सु.१५/८८९, दि. २९/९/२०१५.

आपले लक्ष संदर्भीय पत्राकडे वेधण्यात येत आहे. या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भ क्र. १ चे पत्रान्वये ट्रॅक्टर चालक या संवर्गाची दि. १/१/२०१५ रोजीची प्राथमिक जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आली होती.

सदरील प्राथमिक जेष्ठता यादीवर संबंधीतानी कोणत्याही प्रकारचे आक्षेप नोंदविलेले नसल्याने, तसेच कोणत्याही विभागाकडून कोणत्याही प्रकारे आक्षेप / त्रृटीबाबत अहवाल या कार्यालयास सादर न केल्याने, ट्रॅक्टर चालक संवर्गाची दि. १/१/२०१५ रोजीची जेष्ठता यादी अंतीम स्वरूपात प्रसिध्द करण्यात येत आहे. ती आपले विभागातील संबंधीत कर्मचारी यांचे निदर्शनास तात्काळ आणुन द्यावी. जेष्ठतेबाबत कुठलेही प्रकरण उद्भवल्यास त्यास आपले कार्यालय जबाबदार राहील याची नोंद घ्यावी. सदर जेष्ठतायादी या कार्यालयाचे संकेतस्थळ www.kolhapurforest.co.in यावर प्रसिध्द करणेत आली आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

(एम.के.राव)
मुख्य वनसंरक्षक(प्रा.), कोल्हापूर.